नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १९९ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. २९ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# ओमराजेंना उमेदवारी दिलीच नसती



## उद्धव ठाकरे यांचे ओमराजे यांच्यावर जोरदार हल्लाबोल

**धाराशिव : (स. गांवकरी)**

शिवसेना (ठाकरे) पक्षातून फुटून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेल्या ६ खासदारांच्या लोकसभा मतदारसंघाचा दौरा उद्धव ठाकरे यांनी सुरू केलेला आहे. या दौऱ्यांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या यवतमाळ, वाशिम, हिंगोली जिल्ह्यात जाहीर सभा पाडल्या. त्यानंतर आज (२८ जून) उद्धव ठाकरे यांची धाराशिवमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे यांनी ओमराजे निंबाळकर यांच्याबाबत अनेक गौप्यस्फोट केले आहेत. तसेच सहा खासदार फुटण्याच्या आदल्या रात्री ओमराजे निंबाळकर यांची मनधरणी केली होती, एवढंच नाही तर ओमराजे निंबाळकर यांच्याशी फोनवर बोलणं देखील झालं होतं, असाही खुलासा उद्धव ठाकरे यांनी केला. दरम्यान, ओमराजे निंबाळकर यांच्याबाबत मला आता जी माहिती कळते, ती माहिती आधीच कळाली असती तर ओमराजे निंबाळकर यांना उमेदवारी दिलीच नसती, असं मोठं वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी धाराशिवच्या सभेत बोलताना केलं आहे.

"आता जी काही प्रकरणं मला कळत आहेत, एक-एक प्रकरण समोर येत आहे. हे जर मला आधीच समजलं असतं तर ओमराजे निंबाळकर यांना उमेदवारी दिलीच नसती. पण माझं दुर्दैवं आहे की आता सर्व गोष्टी माझ्या कानावर येत आहेत. खूप भयानक आहे की असा माणूस आपण पोसलाच कसा? त्यामुळे मी आता तुमची माफी मागतो. कारण मी ओमराजे निंबाळकर यांना उमेदवारी दिली नसती, तर तुम्ही त्यांना मतदान दिलं नसतं आणि तुम्ही मतदान दिलं नसतं तर ही कीड वाढलीच नसती", अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी टीका केली आहे. "स्वत:चं पाप झाकण्यासाठी हे खासदार तिकडे गेले आहेत. आता दोन दिवसांपूर्वी आमचे दोन खासदार लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना भेटून आले आहेत. आम्ही त्यांना घटनेचं एक पुस्तक दाखवलं, तर ओम बिर्ला म्हणाले माझ्याकडे आहे. मग आम्ही ओम बिर्ला यांना घटनेतील एक नियम दाखवला. आता ते म्हणत आहेत की ९ पैकी ६ म्हणजे दोन तृतियांश झाले. मात्र, माझ्या आता कानावर असं आलं की या सहा खासदारांचं तिकडे जायचं कधीच ठरलं होतं. फक्त ओमराजे निंबाळकर हे जरा अडून बसले होते. कारण त्यांना माहिती होतं की पाच झालेत, पण सहा होईपर्यंत दोन तृतियांश होत नाहीत, म्हणून थोडं ताणून धरलं. मग भाव वाढवला आणि मग तिकडे गेले", असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला. "जेव्हा आम्ही खासदारांची बैठक बोलावली होती. तेव्हा त्या सहापैकी सहाही खासदारांनी बैठकीला उपस्थित न राहण्यासाठी कारणं सांगितली होती. यवतमाळच्या खासदाराने सांगितलं होतं की माझ्या मुलीच्या सोयरीकीचं काम आहे. मग मी म्हटलं की नका येऊ. हिंगोलीचा गद्दार म्हणाला होता की माझा मुलगा निवडणूक लढवत आहे. मग मी म्हटलं की बरं नका येऊ. धाराशिवचा गद्दार म्हणाला होता की माझा मुलगा हॉस्पिटलमध्ये आहे आणि शिर्डीच्या खासदारांची पत्नी आजारी होती, मग मी म्हटलं की नका येऊ.

मात्र, तेव्हा व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये मला जेव्हा सगळ्यांचे चेहरे दिसायला लागले तेव्हा मी ओमराजे निंबाळकर यांना विचारलं होतं की, तुमचा चेहरा बरोबर दिसत नाहीये. काही तणाव आहे का? की रात्री झोप झालेली नाही? तेव्हा मला ओमराजे निंबाळकर यांनी सांगितलं होतं की, नाही-नाही, माझं सर्व बरोबर आहे. मात्र, तेव्हाच माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली होती की ओमराजे निंबाळकर यांचा चेहरा साफ नाहीये, यांच्या मनात पाप आहे", असा गौप्यस्फोट मोठा उद्धव ठाकरे यांनी केला आहे.



## उठसूट होणारे आरोपाला उत्तर देण्यात अर्थ नाही : चंद्रकांत पाटील

**सांगली : (स. गांवकरी)**

मी मोदींचा भक्त आहे, उठसूट होणाऱ्या आरोपाला उत्तर देण्यात अर्थ नाही, मात्र, पोलीस यंत्रणेवर आरोप करणे खासदार विशाल पाटील यांना खूपच महागात पडेल असे सांगत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी पत्रकार बैठकीत वसंतदादा कारखान्याला कसे कर्ज मिळाले याचे उत्तर द्यावे असे खुले आव्हान दिले.

पोलीस ठाणे लिलावाने विकले जात असून खूनासारख्या गंभीर घटनामध्ये अल्पवयीन मुलाचा सहभाग दाखवून मुख्य संशयितांना सोडले जात असल्याचा आरोप खासदार पाटील यांनी एका शाळकरी मुलाचा खून झाल्यानंतर केला होता. याबाबत पालकमंत्री म्हणाले, पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन योग्य पध्दतीने काम करत असताना खासदार पाटील यांच्याकडून आरोप होत असतील तर त्यांच्याही काही बाजू मला उजेडात आणाव्या लागतील, खासदार खूप हुशार आहेत. त्यांच्या कारखान्याला जिल्हा बँकेचे कर्ज कसे मिळाले याचे उत्तर त्यांनी द्यावे, त्यांच्या कामगिरीबद्दल मी जर पत्रकार बैठकीत बोलायला लागलो तर, त्यांना महागात पडेल. सहकार क्षेत्रात त्यांच्यामुळेच अनेक संस्था अडचणीत आल्या, वसंतदादा कारखाना, सूतगिरणी, बँक यांची काय आणि कशामुळे बिकट अवस्था झाली ? आम्ही दूधखुळे नाही, जिल्ह्यात पोलीस, महसूल यंत्रणा योग्य पध्दतीने काम करत आहे. वसंतदादा, मदन पाटील, विष्णुअण्णा पाटील यांनी चांगले काम केले आहे. याबद्दल आक्षेप घ्यायचे कारण नाही, मात्र, खासदारांच्या कारकीर्दीत जे काम झाले ते मला सांगायला त्यांनी भाग पाडू नये असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

माजी खासदार संजयकाका पाटील यांचा भाजप प्रवेश निश्चित झाला असून त्यांचे नेतृत्व जिल्ह्यात स्थिरावलेले नेतृत्व आहे. काही काळासाठी ते राष्ट्रवादी अजित पवार पक्षात गेले होते. मात्र, पुन्हा त्यांना माहेरी यावे वाटले यात गैर ते काय असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

## थोडक्यात...

### भीमराव कांबळेला फाशी की जन्मठेप?

नसरापूर (स. गांवकरी) : नसरापूर येथे १ मे रोजी झालेल्या निष्पाप चिमुरडीवर झालेल्या लैंगिक अत्याचार व खुनाच्या अमानुष घटनेतील आरोपी भीमराव कांबळेला आज पुणे सत्र न्यायालयात अंतिम शिक्षेचा निकाल लागणार आहे. या प्रकरणाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. न्यायलयाच्या आवारात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात सकाळी ११ वाजता सुनावणी सुरू होणार आहे. न्यायालय निकालाचे वाचन करणार असून, शिक्षा का ठोठावली गेली याची कारणमीमांसा देखील वाचली जाणार आहे. पुणे ग्रामीण पोलिस आरोपी भीमराव कांबळेला कोर्टात हजर करतील. पीडित चिमुरडीच्या कुटुंबीयांना कोर्ट रूममध्ये बसण्याची विशेष परवानगी देण्यात आली आहे. विशेष सरकारी वकील ॲड. अजय मिसर यांच्यासह दोन्ही बाजूचे वकील उपस्थित राहतील. न्यायाधीश निकाल वाचनानंतर आरोपीला शिक्षा सुनावतील. या प्रकरणात आरोपीला फाशी की जन्मठेप अशी शिक्षा होणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

### अकरावीची पहिली विशेष फेरी

पुणे (स. गांवकरी) : राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीच्या प्रवेशासाठी सोमवारपासून (ता. २९) पहिली विशेष फेरी राबविण्यात येत आहे. केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत (कॅप) नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, अर्ज भाग एकमध्ये दुरूस्ती, महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरणे, प्रवेश अर्ज लॉक करणे या प्रक्रियेला सोमवारपासून ते बुधवारपर्यंत (ता. १) मुदत आहे. या फेरीची वाटप यादी शुक्रवारी (ता. ३) जाहीर होणार आहे. राज्यातील नऊ हजार ६६९ कनिष्ठ महाविद्यालयांमधील एकूण २२ लाख १४ हजार ४०६ जागांसाठी अकरावीच्या प्रवेशाची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या जागांसाठी राज्यातील एकूण १४ लाख ३७ हजार ६५६ विद्यार्थ्यांकडून नोंदणी करण्यात आली आहे.

### लोककलावंतांचे जगणे आव्हानात्मक!


पुणे (स. गांवकरी) : 'समाजात समरसता वृद्धिंगत करण्यासाठी लोककलावंतांची भूमिका महत्त्वाची असली, तरी प्रत्यक्षात आजही लोककलावंत उपेक्षित जीवन जगत आहेत. लोककलावंतांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी पुढील महिनाभरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत पुन्हा संमेलन आयोजित करण्यात आले नाही, तर पद्मश्री पुरस्कार परत करेन,' असा इशारा समरसता लोककला संमेलनाचे अध्यक्ष रघुवीर खेडेकर यांनी रविवारी दिला.

### गर्भलिंगनिदान रॅकेटचा विस्तार

केडगाव (स. गांवकरी) : दौंड तालुक्यातील गर्भलिंगनिदान रॅकेटमध्ये केवळ अण्णा गिरीच नव्हे, तर फलटणमधील एका डॉक्टरच्या मार्गदर्शनाखाली समांतर रॅकेट कार्यरत असल्याची खळबळजनक चर्चा आहे. या मास्टरमाईंडने प्रशिक्षित केलेल्या तोतया डॉक्टरांनी पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांत व्हॅनद्वारे लिंगनिदानाचे जाळे पसरवले आहे. पोलिसांनी सध्या गिरीशी संबंधित डॉक्टरांवर तपास केंद्रित केला असला तरी, या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार अद्याप मोकाट असल्याचे बोलले जात आहे. अटक करण्यात आलेल्या डॉक्टरांची ओपीडी कमी असली तरी त्यांची मालमत्ता अफाट आहे. एका आरोपी डॉक्टरचे सात कोटींचे रुग्णालय निर्माणाधीन आहे.

## तरुणाची हत्या झाल्यानंतर माहिममध्येही जीवघेणा चाकूहल्ला

**मुंबई : (स. गांवकरी)**



मुंबईतील लोकल ट्रेनमध्ये अंधेरी आणि बोरिवली दरम्यान किरकोळ वादातून एका प्रवाशाची चाकू भोसकून हत्या झाल्याच्या अवघ्या ४८ तासांनंतर, मुंबईत किरकोळ वादावरून चाकूने हल्ला केल्याची आणखी एक घटना समोर आली आहे. चालताना धक्का लागल्याने एकाचा मबाईल खाली पडला. या रागातून त्याने चाकू हल्ला केल्याचं वृत्त मिड डेने दिलं आहे. ही घटना गुरुवारी रात्री १०.१५ च्या सुमारास माहीम पश्चिम येथील सेनापती बापट मार्गावरील 'न्यू इंडिया बार'जवळ घडली. पीडितेच्या तक्रारीवरून माहीम पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाचा प्रयत्न आणि इतर गुन्ह्यांसाठी एफआयआर नोंदवला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार नवीन प्रसन्ना (३५) गेल्या २५ वर्षांपासून माहीम पश्चिम येथे आपल्या कुटुंबासह राहत आहे. तो त्याचे वडील सुभाष (५५), आई पार्वती (५२), बहीण पूजा (३०) आणि भाऊ सचिन (३२) यांच्यासोबत राहतो. तो लोअर परळ येथील 'लोढा बिल्डिंग'मध्ये ऑफिस बॉय म्हणून काम करतो. आपल्या दैनंदिन दिनचर्येचा भाग म्हणून, नवीन रोज सकाळी माहीमवरून ट्रेनने लोअर परळला जातो आणि रात्री १० च्या सुमारास काम संपवून माहीम रेल्वे स्टेशनवरून पायी घरी परततो. गुरुवारी रात्री माहीम रेल्वे स्टेशनवर आल्यानंतर नवीन सेनापती बापट मार्गाने घरी जात असताना, स्टेशनसमोरील 'बाटा शू मार्ट'जवळ त्याचा एका अज्ञात व्यक्तीला अचानक धक्का लागला.

## मुंबई, पुण्याकडे कंपन्यांनी फिरवली पाठ! कार्यालयीन जागांना घरघर

**पुणे : (स. गांवकरी)**

कार्यालयीन जागांच्या मागणीला चालू वर्षातील दुसऱ्या तिमाहीत घरघर लागल्याचे चित्र आहे. देशातील महानगरांमध्ये मुंबई आणि पुण्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत कार्यालयीन जागांच्या मागणीत सुमारे ३० टक्क्यांपर्यंत घट नोंदविण्यात आली आहे. जागतिक पातळीवरील व्यापारातील अडथळे आणि आर्थिक अनिश्चितता यांचा परिणाम कार्यालयीन जागांच्या मागणीवर प्रामुख्याने झाला आहे. कंपन्यांकडून कार्यालयीन जागांची मागणी कमी झाल्याचे समोर आले आहे.

कॉलिअर्स इंडियाने देशातील महानगरांतील कार्यालयीन जागांच्या मागणीचा एप्रिल ते जून तिमाहीचा अहवाल जाहीर केला आहे. या अहवालानुसार, देशात चालू वर्षातील दुसऱ्या तिमाहीत भाडेतत्वावरील कार्यालयीन जागांचे १ कोटी ७४ लाख चौरस फुटांचे व्यवहार झाले. गेल्या वर्षी याच तिमाहीत हे व्यवहार १ कोटी ७८ लाख चौरस फूट होते. त्यात आता २ टक्क्यांची घट झाली आहे. मुंबईत कार्यालयीन जागांचे २० लाख चौरस फुटांचे व्यवहार झाले असून, त्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत २९ टक्के घट झाली आहे. पुण्यात कार्यालयीन जागांचे १२ लाख चौरस फुटांचे व्यवहार झाले असून, त्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत २५ टक्के घट नोंदविण्यात आली आहे.



> जागतिक पातळीवरील संकटाचा परिणाम देशातील कार्यालयीन जागांच्या मागणीवर झाला आहे. मात्र, जागतिक क्षमता केंद्रांसाठी (जीसीसी) भारताला मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. त्यातून ही मागणी काही प्रमाणात कायम राहण्यास मदत झाली आहे. चालू वर्षात कार्यालयीन जागांची मागणी ७ कोटी चौरस फुटांवर जाण्याचा अंदाज आहे.
>
> **– अर्पित मेहरोत्रा, व्यवस्थापकीय संचालक (कार्यालयीन सेवा), कॉलिअर्स**

देशातील महानगरांमध्ये दुसऱ्या तिमाहीत नवीन कार्यालयीन जागांच्या पुरवठ्यातही मोठी घट झाली आहे. यंदा दुसऱ्या तिमाहीत कार्यालयीन जागांचा पुरवठा १ कोटी ७ लाख चौरस फूट झाला. गेल्या वर्षी याच तिमाहीत तो १ कोटी ४९ लाख चौरस फूट होता. त्यात आता २८ टक्के घट नोंदविण्यात आली आहे. मुंबईत मात्र कार्यालयीन जागांच्या पुरवठ्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत ३१ टक्के वाढ नोंदविण्यात आली असून, तो २१ लाख चौरस फूट झाला आहे. पुण्यात कार्यालयीन जागांच्या मागणीत गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल ५८ टक्के घट झाली असून, तो १४ लाख चौरस फूट झाला आहे, असे अहवालात म्हटले आहे.



## टीईटी पेपरफुटी प्रकरणात दोघांची नावे निष्पन्न

### आंतरराज्यीय टोळीच्या सहभागाची शक्यता

**ठाणे : (स. गांवकरी)**

शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणात दिल्ली आणि आग्रा येथील आणखी दोघांची नावे तपासात समोर आली असून त्यांचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. या पेपरफुटी प्रकरणात आंतरराज्यीय टोळीचा सहभाग असण्याची शक्यता तपास अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, अटकेत असलेल्या तिघांच्या संपर्कातील व्यक्ती, मोबाईल क्रमांक, आर्थिक व्यवहार तसेच डिजिटल पुराव्यांची कसून तपासणी करण्यात येत आहे. या तपासातून आणखी काही नावे समोर येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

भिवंडी पोलिसांनी या प्रकरणात राजीव शाव (वय ४५, बिहार), आकाश कुमार (वय ३०, बिहार) आणि धीरज सिंग (वय २८, हरियाणा) यांना शनिवारी अटक केली आहे. यापैकी राजीव शाव हा विज्ञान शाखेचा पदवीधर असून त्याचा रिअल इस्टेटचा व्यवसाय आहे. तर उर्वरित दोघे शिक्षण घेत असल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. अटक करण्यात आलेल्या तिघांची चौकशी केल्यानंतर त्यांच्या आणखी दोन साथीदारांची नावे निष्पन्न झाली आहेत. हे दोघे अनुक्रमे दिल्ली आणि आग्रा परिसरातील असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यांच्या शोधासाठी विशेष पथके कार्यरत असून, त्यांना ताब्यात घेतल्यानंतर या प्रकरणातील आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे. अटकेत असलेल्या आरोपींकडून वेगवेगळ्या बँकांचे धनादेश आढळून आले आहेत. हे धनादेश पोलिसांनी जप्त केले आहेत. त्यांना धनादेश कोणी दिले, याचा तपास केला जात आहे. चौकट पोलीस पथकाने छापा टाकला त्यावेळी पथकाला प्रश्नपत्रिकांनी भरलेली दोन पाकिटे आढळून आली. यातील पाकिटांवर इंग्रजी भाषेत मजकूर होता. त्यादिशेनेही पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

## ज्योती वाघमारे यांची स्तुती व राऊतांवर टीका

**मुंबई : (स. गांवकरी)**



शिवसेना ठाकरे गटात असलेले नेते व खासदार संजय राऊत यांच्या सकाळच्या पत्रकार परिषदांना तोडीस तोड देता यावी म्हणून शिवसेना शिंदे पक्षाने ज्योती वाघमारे या चळवळीतल्या भाषेवर प्रभुत्व असलेल्या नेतृत्वाला पक्षात घेतले आणि त्यांना खासदारही केले. या ज्योती वाघमारे यांनी संजय राऊत यांना त्यांच्या टीकेला जशास तसे उत्तर देणे अपेक्षित आहे. त्या ज्योती वाघमारे यांनी मात्र कहर केला त्यांनी त्यांचे नेते एकनाथ शिंदे यांना प्रभू श्रीराम यांची उपमा दिली तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्मण लक्ष्मण म्हटले. त्याचवेळी संजय राऊत यांच्या दररोजच्या वक्तव्याचा समाचार घेताना त्यांना महाभारतातील कैकयीची उपमा दिली. त्यामुळे आता ज्योती वाघमारे यांना उत्तर देण्यासाठी शिवसेना ठाकरे गटातील सुषमा अंधारे, किशोरी पेडणेकर यासारख्या नेत्या पुढे सरसावणारे आहेत. आणि हा वाद वाढणार आहे. शिवसेना ठाकरे पक्षातील सहा खासदार फोडल्यानंतर शिंदे पक्षातील खासदारांनी एकनाथ शिंदे यांना रामाची उपमा दिली तर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्मण म्हटले आहे. खासदार फुटीमध्ये रामाला लक्ष्मणाची साथ मिळाल्याची कबुली शिंदे पक्षाच्या खासदार ज्योती वाघमारे यांनी दिली. राऊत हे ठाकरे पक्षाची कैकयी आहे. त्यांच्या तोंडाला कुलुप लावले नाही तर ठाकरे पक्षाला कुलुप लागेल, असा सल्ला वाघमारे यांनी दिला. शिवसेना शिंदे पक्षाच्या खासदार वाघमारे यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार टीका केली. ठाकरे पक्षातील खासदार फुटीचे वर्णन करताना त्यांनी संपूर्ण नाटयाला राम-रावणाच्या प्रतीकांचा उल्लेख केला. रावणाचा वध करताना प्रभू रामाला लक्ष्मणाची साथ लाभली होती. आज राम कोण आणि लक्ष्मण कोण, हे जनता ठरवेल. रामाच्या हातात मात्र धनुष्यबाण असतो. शिवसेना शिंदे पक्षाचे चिन्ह धनुष्यबाण आहे आणि शिंदे यांनी हे प्रतिकात्मक धनुष्यबाण अनेक वेळा हाती घेतले आहे. रावणाचा अंत झालाच पाहिजे असे त्या म्हणाल्या.

# थोडक्यात पण महत्वाचे

## डी. फार्मसी निकालात मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसीचे घवघवीत यश




अकोले (स. गांवकरी) : आंतरभारती रूरल इंटरनॅशनल मेडिकल एजुकेशन ट्रस्ट संचलित मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी, वीरगाव येथील डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा प्रथम वर्ष डी. फार्मसीचा निकाल १०० टक्के लागला असून द्वितीय वर्ष डी. फार्मसीचा निकाल ९०.४७ टक्के लागला आहे. प्रथम वर्षामध्ये पूजा आनंदा गिर्हे हिने ७६.१० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. ईश्वरी जितेंद्र जगताप हिने ७३.१० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तर मीनाक्षी लक्ष्मण फरगडे हिने ७२.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. द्वितीय वर्षामध्ये ताहुरा शाकीर पटेल हिने ८५.१८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. आरिना इकबाल शेख हिने ७७.३६ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तर नौशिन नासिर खान हिने ७६.३६ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री. रावसाहेब वाकचौरे, सचिव मा.डॉ. अनिल रहाणे संचालिका सुप्रिया वाकचौरे, गीता रहाणे, प्राचार्या डॉ. पल्लवी फलके-कोटकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले असून भविष्यातही अशाच प्रकारे महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



## आळंदीत पल्स पोलिओ मोहिमेच्या लसीकरणास उत्साही प्रतिसाद

आळंदी (स. गांवकरी) : राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमे अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने आळंदी परिसरातील 19 केंद्र वर बस पोलिओचे लसीकरण करण्यात आले याच पालकांनी मोठा प्रतिसाद देत आपल्या बालकांना घेऊन लसीकरणासाठी येऊन लसीकरण करून घेतले आळंदी येथील आयोजित लसीकरण मोहिमेची पाहणी करण्यासाठी अतिरिक्त संचालक डॉ संदीप सांगळे, SMO डॉ चेतन खाडे यांनी ग्रामीण रुग्णालय आळंदी आणि माऊली मंदिर पोलिओ बूथ केंद्र येथे भेट देऊन कामकाजाची माहिती घेत संवाद साधला.या वेळी आळंदी ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ उर्मिला शिंदे यांचे सह नियुक्त कर्मचारी, आरोग्य सेवक उपस्थित होते. आळंदी खेड आणि आळंदी हवेली भागातील १९ केंद्रावर लसीकरणाची सोय करण्यात आली होती. परिसरातील उद्दिष्ट पेक्षा जास्त लसीकरण करण्यात आल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. उर्मिला शिंदे यांनी सांगितले. उत्साहात लसीकरण अभियान राबविण्यात आले. आळंदी नगरपरिषद उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, कालिदास तापकीर, रुग्ण हक्क समिती सदस्य डी. डी. भोसले पाटील, ग्लोबल समाज सहाय्यक समितीचे मार्गदर्शक रामचंद्रकाका कुऱ्हाडे पाटील, आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, गोविंद ठाकूर आदी मान्यवर यांनी सदिच्छा भेट देत मुलाना पल्स पोलिओ डोस देत, कामाची माहिती घेत पाहणी केली. लसीकरण दिनी 6 हजार 258 लाभार्थ्यांचे उद्दीष्ट होते. यात 6 हजार 134 लाभार्थ्यांना लस पाजण्यात आली. sunare 98 टक्के काम लसीकरण दिनी सर्व केंद्र मिळून झाले. असे डॉ. उर्मिला शिंदे यांनी सांगितले.

## आशियातील सर्वात मोठ्या पुनर्वापर व शाश्वतता विषयक कार्यक्रम

पुणे (स. गांवकरी) : २०३५ पर्यंत ६९ ह्या कोटींपर्यंत मजल मारण्याची क्षमता असलेला आणि सध्या ३० हजार कोटी रुपये मूल्य असलेला भारतातील प्लास्टिक पुनर्वापर उद्योगासाठी तिसरी ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्झिबिशन ऑन प्लास्टिक रिसायकलिंग अँड सस्टेनेबिलिटी (जीसीपीआरएस २०२६) आयोजित करण्यात येणार आहे. ही परिषद २ ते ५ जुलै २०२६ दरम्यान नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे होणार असून अखिल भारतीय पातळीवरील अग्रगण्य संस्था ऑल इंडिया प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (एआयपीएमए)ने हे आयोजन केले आहे. या चार दिवसीय परिषदेला रसायन व खते मंत्रालय, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, नीती आयोग तसेच गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभणार आहे. जीसीपीआरएसचे अध्यक्ष श्री. अरविंद मेहता आणि एआयपीएमएचे अध्यक्ष श्री. सुनील शाह यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रगत धोरणे, उद्योगातील सहकार्य आणि जबाबदार संसाधन व्यवस्थापन व परिपत्र अर्थव्यवस्था या घटकांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून भारतातील शाश्वतता परिसंस्था मजबूत करण्यावर सातत्याने भर देण्यात येत आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पाचही जिल्ह्यांत सक्षम यंत्रणा उभारणार : अप्पर आयुक्त दिनकर पावरा!







नाशिक: (स. गांवकरी)

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये सक्षम व प्रभावी यंत्रणा उभारण्यात येणार असल्याची माहिती अप्पर आयुक्त दिनकर पावरा यांनी दिली. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'वार्तालाप' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे पाटील तसेच विविध पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान अप्पर आयुक्त दिनकर पावरा आणि उपआयुक्त निलेश अहिरे यांचा साईबाबांची मूर्ती, शाल, घड्याळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात दिनकर पावरा यांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्थानिक यंत्रणा यांच्यात अधिक प्रभावी समन्वय साधला जाईल, असे सांगितले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मवेशी आश्रमशाळेतील विनयभंग प्रकरणाचा उल्लेख करताना, पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच आदिवासी भागात सर्पदंशाच्या वाढत्या घटनांचा गांभीर्याने विचार करून तातडीची आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण मान्यवरांना देण्यात आले. कार्यक्रमात आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्थानिक यंत्रणा एकत्रितपणे कार्य करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## केतन अग्रवाल प्रकरणानंतर विवाहपूर्व तपासणीची गरज

पुणे : (स. गांवकरी)

पुण्यासह देशभरात चर्चेत असलेल्या केतन अग्रवाल खून प्रकरणानंतर विवाहपूर्व पार्श्वभूमी पडताळणी आणि भावी जोडीदाराची सत्य माहिती जाणून घेण्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे, असे प्रतिपादन स्विफ्ट डिटेक्टिव्ह अँड इन्व्हेस्टिगेशनच्या संचालिका डिटेक्टिव्ह प्रिया काकडे यांनी केले. पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. विवाहपूर्व तपासणी, विवाहबाह्य संबंध, वैवाहिक फसवणूक, आर्थिक गुन्हे, घटस्फोट आणि कौटुंबिक वाद यासंदर्भातील अनुभव त्यांनी यावेळी मांडले. प्रिया काकडे म्हणाल्या की, लग्न हा व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा निर्णय असतो. मात्र आजही अनेक कुटुंबे केवळ आर्थिक स्थिती, सामाजिक प्रतिष्ठा, शिक्षण किंवा बाह्य आकर्षण पाहून विवाह ठरवतात. भावी वधू किंवा वराचे पूर्वीचे संबंध, घटस्फोट,



- अनेक कुटुंबे फसवणूक आणि संकटांपासून वाचू शकतात : डिटेक्टिव्ह प्रिया काकडे
- विवाहपूर्व पार्श्वभूमी पडताळणी ही आता पर्याय नव्हे तर काळाची गरज!

आर्थिक व्यवहार, गुन्हेगारी पार्श्वभूमी, मानसिक स्थिती किंवा इतर महत्त्वाच्या बाबींची पडताळणी केली जात नाही.

## लोककलावंतांची आबाळ दूर करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा

### पहिल्या समरसता लोककला संमेलनाच्या अध्यक्षपदावरून पद्मश्री रघुवीर खेडेकर यांची मागणी

पुणे : (स. गांवकरी)

समाजात समरसता वृद्धिंगत करण्याच्या कामात लोककलावंतांचा सहभाग वाढावा या उद्देशाने समरसता लोककला संमेलन आयोजित करण्याचा उपक्रम उल्लेखनीय असला तरी प्रत्यक्षात खुद्द लोक कलावंत अद्यापही उपेक्षितांचे जगणे जगत असून त्यांची आबाळ दूर करण्यासाठी शासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी आग्रही मागणी पहिल्या समरसता लोककला संमेलनाचे अध्यक्ष पद्मश्री रघुवीर खेडेकर यांनी केली.

लोककलावंतांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचाव्या, लोककलावंतांमध्ये विचारांचे आदान प्रदान व्हावे व विविध लोककलांचा रसिकांना परिचय व्हावा, या दृष्टीने राज्याचा सांस्कृतिक विभाग, सांस्कृतिक संचालनालय आणि समरसता साहित्य परिषद यांच्या वतीने या



वर्षापासून समरसता लोककला संमेलन आयोजित करण्यात येत आहे. या पहिल्या संमेलनात ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी नर्तिका मधू कांबीकर यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे त्या अनुपस्थित असल्याने त्यांच्या वतीने त्यांच्या भगिनी रत्ना कांबीकर यांनी स्वीकारला.

याप्रसंगी मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आलेगांवकर, लोककलावंत नंदेश उमप, पद्मश्री वितहाबाई नारायनगावकर यांच्या कन्या मंगला बनसोडे, लीला गांधी, जयमाला इनामदार, सुरेखा पुणेकर, छाया आणि माया खुतेगावकर, राधा खुडे, बिग बॉस फेम अहिराणी गायक सचिन कुमावत, नृत्यांगना वैशाली जाधव, रेशमा मुसळे, अनिल मोरे, सांस्कृतिक कार्य संचालनायाच्या जान्हवी जानकर, वारकरी परिषदेचे अध्यक्ष विश्वनाथ गराडकर, भाजप शहराध्यक्ष आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष धीरज घाटे, संमेलनाचे आयोजक धनंजय खुडे, निलेश गद्रे, डॉ प्रसन्न पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

समाजात एकोपा वाढावा, विचारांची देवाण-घेवाण व्हावी, म्हणजेच सामाजिक समरसता! लोक कलावंत आपल्या कलेच्या माध्यमातून शतकानुशतके प्रबोधनाचे, सांस्कृतिक आदान प्रदानाचे आणि सलोखा निर्माण करण्याचे कार्य परंपरेने करीत आहेत. मात्र, लोक कलावंतांचे स्वतःचे जगणे अजूनही आव्हानात्मक स्वरूपाचे आहे, याकडे खेडेकर यांनी आपल्या भाषणात लक्ष वेधले.

शासनाच्या लोककलावंतांकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी लोक कलावंत निश्चितपणे पुढे येतील. मात्र, लोककलावंतांकडे आजही गावकुसाबाहेर असल्याप्रमाणे बघितले जात आहे. आपली कला सादर करण्यासाठी गावोगाव फिरणाऱ्या कलावंतांना प्रस्थापितांकडून अन्याय सहन करावा लागतो. स्थानिक पोलिस आणि प्रशासन देखील कलावंतांच्या तक्रारींची दखल न घेता प्रस्थापितांची पाठराखण करतात. हे सर्व आम्हाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या कानावर घालायचे होते. मात्र, त्यांच्या अनुपस्थितीने आमची निराशा झाली, असे परखड मतही खेडेकर यांनी व्यक्त केले.

## स्वधा संस्थेच्या माध्यमातून मामनोली गावात आरोग्य शिबिर संपन्न

- १०० पेक्षा जास्त नागरिकांनी घेतला लाभ
- ग्रामपंचायत मामनोली, भरत दळवी युवा विकास मंच मुरबाड विधानसभा आणि ठाणे जिल्हा एकता मंच यांचा पुढाकार

कल्याण : (स. गांवकरी)




मुरबाड विधानसभा मतदार संघातील कल्याण ग्रामीण मधील मामनोली गावात नुकतच स्वधा संस्था कल्याण यांच्या माध्यमातून आणि ग्रामस्थ मंडळ मामनोली, ग्रामपंचायत मामनोली, ठाणे जिल्हा एकता मंच कल्याण ग्रामीण, भरत दळवी युवा विकास मंच मुरबाड विधानसभा यांच्या संयोजनाने ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय मामनोली या ठिकाणी आरोग्य शिबिर संपन्न झाले. या शिबिराचा शुभारंभ मामनोली गावचे सरपंच तुषार कोर, ठाणे जिल्हा एकता मंच राष्ट्रीय संस्थापक अब्बासभाई शेख, ठाणे जिल्हा एकता मंच राष्ट्रीय उपाध्यक्ष नजीरभाई शेख, मामनोली गावातील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण उर्फ बाळा कोर, ग्रामपंचायत कर्मचारी पद्माकर कोर, स्वधा संस्थेचे प्रतिनिधी शिवाजी भोईर आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत झाला. या शिबिरामध्ये आलेल्या मान्यवरांचे ग्रामस्थांतर्फे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. दिवसभरात झालेल्या शिबिरामध्ये 100 पेक्षा जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. या शिबिरामध्ये रक्त तपासणी, हिमोग्लोबिन रक्त तपासणी, हाडे तपासणी, मधुमेह तपासणी, ऑक्सीजन लेवल तपासणी , वजन तपासणी,कॅल्शियम , काही जनरल आजार तपासणी, स्त्री रोग विषयक तपासणी आदी तपासण्या करण्यात आल्या . अनेक महिला, तरुण नागरिक, ज्येष्ठ महिला, ज्येष्ठ नागरिक यांनी या शिबिराचा लाभ घेतला. या शिबिराला सामाजिक कार्यकर्ते सागर जाधवही उपस्थित होते.मामनोली गावातील आशा कार्यकर्ती कोर ताई, सामाजिक कार्यकर्ते दामोदर कोर यांचेही सहकार्य लाभले. या शिबिरासाठी स्वधा संस्थेच्या माध्यमातून डॉक्टर जयवंती ठमके, डॉक्टर भूमिका गिरी, डॉक्टर अक्षिता किरनेकर, प्रयोगशाळा तज्ञ डॉक्टर अभिषेक, रोहिणी म्हसे, मोनाली रॉय, टेसी फ्रेडी, सोशल वर्कर शिवाजी भोईर, महेंद्र जाधव, सरिता पवार ,सविता शुक्ला, प्रेमा भट,नैतिक आदींनी मेहनत घेतली. भविष्यात कल्याण ,मुरबाड तालुक्यात आरोग्यविषयक जनजागृती व्हावी यासाठी विविध शिबिरे राबविली जातील असे भरत दळवी यांनी सांगितले.

## 'महात्मा फुले वाड्या'तील वटपूजनावरील बंदी मागे

पुणे : (स. गांवकरी)



- हिंदु जनजागृती समितीसह हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या पाठपुराव्याला यश

पुण्यातील ऐतिहासिक महात्मा फुले वाडा परिसरातील वटवृक्षाच्या पूजनावर पुरातत्त्व विभागाने घातलेली बंदी अखेर शासनाने मागे घेतली असून, हिंदु जनजागृती समिती, राष्ट्रभक्त अधिवक्ता समिती, हिंदु राष्ट्र समन्वय समिती, सुराज्य अभियान आणि रणरागिणी शाखा आदी संघटनांनी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. या निर्णयानंतर संबंधित संघटनांनी समाधान व्यक्त केले असून बंदी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही केली आहे. महात्मा फुले वाडा परिसरातील वटवृक्षाच्या पूजनावर संभाव्य निर्बंध घालण्यात आल्यानंतर संबंधित हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या शिष्टमंडळाने पुरातत्त्व विभाग, पोलीस प्रशासन तसेच पुणे महानगरपालिका आयुक्त कार्यालयात निवेदने सादर करून ही बंदी तातडीने मागे घेण्याची मागणी केली होती. या निवेदनात हा निर्णय हिंदू महिलांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर आणि संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवर आघात असल्याचा दावा करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे सहाय्यक संचालक डॉ. विलास वाहने यांनी खडक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना पत्र पाठवून महात्मा फुले वाडा हे राज्य संरक्षित स्मारक घोषित होण्यापूर्वीपासून सुरू असलेल्या परंपरा व चालीरीती कायम ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

# शिवमहापुराण कथा श्रवणाने जीवन पवित्र होते; नित्य शिवपूजा व भक्तीचे महत्त्व अधोरेखित!

**नाशिकच्या तपोवन येथे पाच दिवसीय शिवमहापुराण कथेचा सांगता सोहळा उत्साहात संपन्न!**








नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक येथील तपोवन, गोदावरी तीरावर आयोजित पाच दिवसीय भव्य शिवमहापुराण कथा आणि शिवकथा सांगता सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यास महाराष्ट्रासह गुजरात, अहमदाबाद, मुंबई, मुलुंड, भिवंडी आदी भागांतून हजारो भाविकांनी उपस्थित राहून शिवकथेचा लाभ घेतला.

यावेळी परमपूज्य डॉ. संत श्री ब्रुजभूषण बापू यांनी आपल्या प्रवचनातून सांगितले की, "शिवमहापुराण कथा ऐकण्यासाठी देवसुद्धा पृथ्वीवर अवतरतात. प्रत्येकाने नित्यनेमाने भगवान महादेवाची पूजा करावी. देवाला कोणत्याही ऐहिक वस्तूंची अपेक्षा नसते; आपल्या प्रत्येक भक्ताचे जीवन सुखी व्हावे हीच त्यांची इच्छा असते. भक्ताने श्रद्धेने बेलपत्र अर्पण करून एक लोटा जलाभिषेक करावा, भस्म धारण करून महादेवाचे दर्शन घ्यावे. अशा भक्तांचे रक्षण करणे हेच शिवशंभूचे कर्तव्य आहे."

या कथेच्या सांगता सोहळ्यास ज्येष्ठ समाजसेवक शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या स्मरणार्थ देशभरात रामायण, महाभारत, भागवत आणि शिवमहापुराण यांसारख्या धार्मिक कथांचे आयोजन करण्यात येत असून समाजात अध्यात्म आणि संस्कारांची जोपासना हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमात डॉ. विश्वासराव आरोटे यांनी एन.के.टी. ट्रस्टच्या सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्याचा गौरव करताना ट्रस्टचे कार्य सातासमुद्रापार पोहोचल्याचे सांगितले. तसेच परमपूज्य श्री श्री १००८ स्वामी हरि चैतन्य ब्रह्मचारीजी महाराज यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

या सोहळ्यास शिक्षणतज्ज्ञ अर्जुन गोहिल, गोविंदभाई राठोड, मनुभाई माकवाना, हिराबाई वाघेला, गणपतराव पिंजरे, पत्रकार गायत्री लचके, सुनील उगले, दादाभाई मांढरे, अरुण मोरे, छाया भानुषाली यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिवशंकराची प्रभावी भूमिका श्रीकांत मधुसूदन शेरताटे यांनी साकारली. त्यांच्या अभिनयाचे उपस्थित भाविकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. तसेच क्षिरसाठे परिवाराने कथा यशस्वी होण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी एन.के.टी. ट्रस्टच्या वतीने सर्व मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह, घड्याळ व संदेश प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. अन्नदानाद्वारे सहकार्य करणाऱ्या सर्व दानशूरांचे विशेष आभार मानण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष योगदान दिल्याबद्दल रामजीभाई पटेल यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनीच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर सुनीता मधुसूदन शेरताटे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली. संपूर्ण परिसर "हर हर महादेव"च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

# इतके निष्क्रीय अधिकारी मी प्रथमच पाहतोय

> तालुक्यातील मवेशी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या विनयभंग प्रकरणाची एका कार्यकर्त्यांनी माहिती देताच त्याची गंभीर दखल घेत्, या प्रकरणाची विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावेळी दिली. आदिवासी विकास विभागाच्या सुमारे ५०० कोटी रुपयांच्या विविध कामांसह् अनेक कामाची ठेकेदाराची बिले मिळालेली नाहीत त्यामुळे विकास कामे अपूर्ण आहेत ठेकेदाराची बिले मिळावी जेने करून कामे पूर्णत्वाकडे जातील अशी मागणी बाजीराव दराडे यांनी केली असता या प्रश्ना संदर्भात आदिवासी विकास मंत्री समवेत आधीवेशन नंतर बैठक घेऊन चर्चा करण्याचे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिले. महायुतीतील काम करणारे कार्यकर्ते वर अन्याय होणार नाही याची काळजी घ्यावी महायुतीच्या पदाधिकाऱ्याचे काम घेऊन आल्यावर अधिकाऱ्यांनी ते प्राधान्याने करावे.जे अधिकारी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना जुमानत नाही तर त्यावर कारवाई करेल.

अकोले : (स. गांवकरी)



पाणी टंचाई सारख्या महत्वाच्या प्रश्नावर तहसीलदार व बीडीओ यांना गांभीर्य नाही इतके निष्क्रीय अधिकारी मी प्रथमच पाहत आहे. असा संताप पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. अकोले तालुक्यातील प्रशासकीय आढावा बैठक विठ्ठल लॉन्स येथे संपन्न झाली यावेळी पालकमंत्री ना.विखे बोलत होते. या बैठकीस आमदार डॉ. किरण लहामटे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, तहसीलदार सिद्धार्थ मोरे, गटविकास अधिकारी अमर माने, नगरपंचायत मुख्याधिकारी सौ.धनश्री पवार, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, कैलास वाकचौरे, शिवाजीराजे धुमाळ, सीताराम भांगरे, गिरजाजी जाधव,विकास वाकचौरे, भाऊसाहेब वाकचौरे, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

अकोले आदिवासी तालुका आहे येथे जबाबदारीने काम केले पाहिजे तालुक्यात 10 टक्केच पाऊस झाला टँकर सुरु आहेत अधिकारिणी किती संवादनशील असले पाहिजे मात्र अकोलेच्या तहसीलदार बीडीओ ,तलाठी ,ग्रामसेवकांना कुणालाच टंचाई बाबत माहिती देता येत नाही. लोकांना पिण्यास पाणी मिळत नाही याचा काहिच फरक प्रशासनाला पडत नाही. अकोलेचे प्रशासन निष्क्रिय असल्याचे दिसते. अधिकारी सरकार साठी काम करत नाही तर ठेकेदारासाठी काम करत आहे का असा प्रश्न उपस्थित करत यापुढे आता असे चालणार नाही, आदिवासी भागातील योजनांची अंमलबजावणी वेळेत व दर्जेदार पद्धतीने होणे आवश्यक असून, नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यावर भर द्यावा. शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणेचे काम प्रशासनाने करावे अश्या सूचना राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

पुढे बोलताना पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, नागरिकांना वेळेवर पाणीपुरवठा होण्यासाठी आवश्यक समन्वय ठेवावा. गावपातळीवरील नियोजन अधिक प्रभावीपणे करण्यात यावे. टँकर नियोजनाबाबत वस्तुस्थितीशी सुसंगत माहिती सादर करण्यात यावी आणि टंचाईच्या काळात नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेऊन पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा.

बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या अपूर्ण पाणीपुरवठा योजनांचाही आढावा घेण्यात आला. ३२ गावे, एक दरी व शमशेरपूर या प्रादेशिक योजनांतील प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला. देवठाण पाणीपुरवठा योजनेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेत या प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले. अपूर्ण कामांसाठी संबंधित ठेकेदारांना नोटीस बजावून अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले.

बैठकीत विविध विकासकामांच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला. लहीत खुर्द येथील पाझर तलावाच्या कामाच्या गुणवत्तेबाबत प्राप्त तक्रारींची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच धामणगाव आवारी येथील उच्चस्तरीय पाइपलाइनचे पाणी स्थानिक बंधाऱ्यात सोडण्याबाबत तातडीने सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

अधिकारी व कर्मचाऱ्यांना लोकप्रतिनिधींसोबत समन्वयाने काम करावे. विकासकामांच्या मंजुरीपासून अंमलबजावणीपर्यंत सर्व प्रक्रिया पारदर्शक ठेवून नागरिकांच्या अडचणींचे वेळेत निराकरण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. कामकाजात जबाबदारी, गुणवत्ता व वेळेचे नियोजन यांना प्राधान्य द्यावे, यापुढे प्रत्येक विभागाचा स्वतंत्रपणे सविस्तर आढावा घेतला जाईल आणि कामांच्या प्रगतीचे नियमित परीक्षण केले जाईल, असेही श्री.विखे पाटील यांनी सांगितले.

योजना सुरु करताना उद्भव पाहिले पाहिजे.नुसत्या योजना करून उपयोग नाही जीवन प्राधिकरण --प्रत्येक कामात विलंब का झाला तसेंच.किती ठेकेदारांना योजना अपूर्ण असताना किती नोटीसा दिल्या हे अधिकारीना सांगता येत नाही .लवकरात लवकर अधिकृत लुहून माहिती मला पाठवा मुंबईत संबधित मंत्रीशी बैठक लावतो.या विभागाचे अधिकारी उद्धट बोलतात बेजबाबदार पणे वागतात अश्या तक्रारी आहेत.त्यामुळे सगळ्यात निष्क्रिय खाते जल जीवन व जीवन प्राधिकरण खाते असल्याचे मत ना.विखे यांनी व्यक्त केले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### जैवविघटनशील घनकचऱ्यापासून अवघ्या २४ तासांत सेंद्रिय खत निर्मिती



पुणे (स. गांवकरी) : शहरे आणि गावांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या जैवविघटनशील घनकचऱ्याच्या समस्येवर प्रभावी उपाय म्हणून पेटंट प्राप्त मायक्रोब्सच्या सहाय्याने विकसित करण्यात आलेले नियंत्रित अनएरोबिक कंपोस्टिंग (एसीसीएमए) तंत्रज्ञान पुढे आले आहे. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जैवविघटनशील कचऱ्याचे केवळ २४ ते ३६ तासांत उच्च दर्जाच्या सेंद्रिय खतामध्ये रूपांतर करता येत असून, देशातील या प्रकारचे हे पहिले संशोधन असल्याचा दावा करण्यात आला. एव्हीके ग्रीन सोल्यूशन्स प्रा. लि. या पिनाक ग्रुपच्या उपकंपनीने विकसित केलेल्या अत्याधुनिक सेंद्रिय कचरा प्रक्रिया प्रकल्पाचे तसेच सस्टेरा प्रा. लि.च्या पर्यावरण प्रयोगशाळेचे उद्घाटन खासदार मेधा कुलकर्णी, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापालिकेतील विरोधी पक्षनेते ॲड. नीलेश निकम, नगरसेविका मंजुषा खर्डेकर यांच्या उपस्थितीत झाले.

### डेलॉईट इंडिया जीएसटी@9 सर्वेक्षण : एमएसएमईंचा सुधारणांना पाठिंबा

पुणे (स. गांवकरी) : भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) आर्थिक विकास, निर्यात आणि रोजगार निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असताना, जीएसटीबाबत त्यांची धारणा केवळ अनुपालनाच्या बंधनातून बदलत जाऊन औपचारिकता आणि कार्यक्षमतेला चालना देणाऱ्या प्रणालीकडे वळली आहे. रिटर्न भरण्याची सुलभ प्रक्रिया आणि मर्यादांमध्ये (थ्रेशोल्ड) करण्यात आलेल्या शिथिलतेमुळे अनुपालन सुलभ झाले असले, तरी उद्योगांना जीएसटी सुधारणांच्या पुढील टप्प्यात तरलता वाढविणे, इनपुट टॅक्स क्रेडिट ( आयटीसी) नियम अधिक सोपे करणे आणि कार्यरत भांडवलावरील दबाव कमी करणे यांना प्राधान्य दिले जावे, अशी अपेक्षा आहे. डेलॉईट इंडिया यांच्या जीएसटी@9 सर्वेक्षण : द नेक्स्ट फेज – जीएसटी 2.0 नुसार, एमएसएमई आता केवळ जीएसटीचा अवलंब करण्यापलीकडे जाऊन त्याच्या अधिक परिणामकारक वापरावर भर देत आहेत. सर्वेक्षणातील निष्कर्षांमधून तरलता वाढविणे आणि अनुपालन प्रक्रिया सुलभ करण्यासाठी करण्यात येणाऱ्या सुधारणांना मोठा पाठिंबा असल्याचे दिसून आले आहे. सर्वेक्षणातील जवळपास 89 टक्के प्रतिसादकर्त्यांनी जीएसटी परतावा आणि प्री-डिपॉझिटच्या विलंबित रकमेवर स्वयंचलित व्याज देण्यास समर्थन दिले, तर 88 टक्के प्रतिसादकर्त्यांनी इनव्हॉइस-आधारित इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) पात्रतेला पाठिंबा दर्शवला. तसेच, 87 टक्के प्रतिसादकर्त्यांनी त्रैमासिक कर भरणा यंत्रणेचे समर्थन केले. एमएसएमईंमध्ये त्रैमासिक रिटर्न भरण्याची सुविधा ही जीएसटीमधील सर्वाधिक ओळखली जाणारी सुधारणा ठरली असून, तिची ओळख 2023 मधील 12 टक्क्यांवरून 2026 मध्ये 67 टक्क्यांपर्यंत म्हणजेच पाच पटांहून अधिक वाढली आहे. एमएसएमई परिसंस्था मजबूत करण्यामध्ये जीएसटीच्या भूमिकेबाबत बोलताना, गोकुल चौधरी, अध्यक्ष (कर), डिलॉइट साउथ एशिया म्हणाले, “भारतातील एमएसएमई देशाच्या एकूण उत्पादनात सुमारे एक-तृतीयांश आणि निर्यातीत जवळपास निम्मे योगदान देतात. देशाच्या पुरवठा साखळीच्या कार्यक्षमतेसाठी तसेच पारदर्शक आणि औपचारिक व्यावसायिक परिसंस्था निर्माण करण्यासाठी जीएसटी हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. सुधारणांच्या पुढील टप्प्यात परतावा प्रक्रिया अधिक प्रभावी करणे, इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) नियम सुलभ करणे आणि कर सवलतींचा अखंडित वापर सुनिश्चित करून कार्यक्षमता आणि तरलता वाढविण्यावर भर दिला गेला पाहिजे.

## मेटाने ईशान्य भारतातील उद्योजकतेचा उत्साह प्रकाशझोतात आणला

पुणे : (स. गांवकरी)

वर्ल्ड सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग डेच्या निमित्ताने आज मेटाने ईशान्य भारतातील लघु व्यवसाय मालकांना गुवाहाटी येथे एका महत्त्वपूर्ण कार्यक्रमासाठी एकत्र आणले, ज्यामध्ये त्यांच्या कथा प्रकाशझोतात आणल्या गेल्या आणि वाढीचे नवीन मार्ग उघडले गेले. या कार्यक्रमाला ईशान्य भारतातील जवळपास 350 व्यवसायांनी हजेरी लावली, ज्यातून या प्रदेशातील उद्योजकतेचा उत्साह अधोरेखित झाला. भारतामध्ये मेटा प्लॅटफॉर्म्स वापरणाऱ्या 92% पेक्षा जास्त व्यवसाय MSMEs आहेत. दररोज उद्योजक फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲप वापरून ग्राहक शोधतात, ब्रँड तयार करतात आणि महसूल वाढवतात, अनेकदा मर्यादित संसाधने आणि छोट्या टीम्ससह. लघु व्यवसाय हे भारताच्या वाढीच्या कथेचे केंद्र आहेत. या कार्यक्रमात ईशान्य भारतातील उद्योजकांनी कसे स्केलेबल ब्रँड्स तयार केले, स्थानिक रोजगार निर्माण केले आणि त्यांच्या समुदायांमध्ये इनोव्हेशन घडवले हे अधोरेखित केले. स्थानिक ब्रँड्स, कारागीर, रिटेलर्स आणि क्रिएटर्स यांचा विविधतेने भरलेला समूह ईशान्य भारताच्या व्यवसाय समुदायाच्या वाढत्या महत्वाकांक्षेचे प्रतिबिंब दाखवतो. पूर्वी मर्यादित पोहोच असलेल्या या ब्रँड्सना डिजिटल टेक्नॉलॉजी आणि मेटा ॲड्सच्या मदतीने शोधले जाण्याची संधी मिळाली आणि भारतभर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तार करण्याची संधी मिळाली. कृत्रिम बुद्धिमत्ता -पावर्ड टूल्स व्यवसायांना कॅम्पेन क्रिएशन ऑटोमेट करण्यास, परफॉर्मन्स सुधारण्यास आणि क्रिएटिव्ह ॲसेट्स पूर्वीपेक्षा जलद तयार करण्यास मदत करत आहेत. मेटाचे ॲडव्हान्टेज+ सूट आणि जनरेटिव्ह एआय क्रिएटिव्ह टूल्स सर्व आकाराच्या व्यवसायांसाठी ॲडव्हान्स्ड मार्केटिंग क्षमता अधिक सुलभ करत आहेत.

## घरच्या घरी सुपर केन रोपवाटिका तयार करून ऊस लागवड करा : विकास चव्हाण

निमगाव सावा : (स. गांवकरी)



"एकरी शंभर टन ऊस उत्पादन घेण्यासाठी उसाचे दर्जेदार व सशक्त रोप हीच पहिली पायरी आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने घरच्या घरी कमी खर्चात सुपर केन रोपवाटिका तयार करून ऊस लागवड करावी," असे प्रतिपादन श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे तज्ज्ञ संचालक विकास हरिभाऊ चव्हाण यांनी केले.

श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने औरंगपूर (ता. जुन्नर) येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी प्लास्टिक ट्रे अथवा कोकोपीटचा वापर न करता सहज व कमी खर्चात गादी वाफ्यावर सुपर केन रोपवाटिका उभारण्याची पद्धत शेतकऱ्यांना सविस्तर समजावून सांगितली. रोपवाटिकेसाठी ९ ते १० महिन्यांचा सशक्त ऊस बेणे म्हणून निवडल्यास एकरी लागवडीसाठी केवळ २५ मुळ्या पुरेशा ठरतात. त्यामुळे बेण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते. एक डोळ्याच्या टिपऱ्यांवर शिफारशीनुसार बेणे प्रक्रिया करून तयार केलेली रोपे अवघ्या २५ दिवसांत लागवडीसाठी सक्षम होतात, असे त्यांनी सांगितले.

सुपर केन रोपवाटिकेत तयार होणाऱ्या एका रोपाचा खर्च अवघा ७० पैसे इतका येतो, तर बाहेरून विकत घेतलेल्या रोपासाठी शेतकऱ्यांना सुमारे २ रुपये ७० पैसे खर्च करावा लागतो. त्यामुळे एकरी लागवडीत १४ ते १५ हजार रुपयांपर्यंत खर्चाची बचत होते. शिवाय या तंत्रज्ञानामुळे पाण्याची लक्षणीय बचत होत असून घरच्या घरी तयार केलेली सशक्त रोपे जमिनीत लवकर स्थिरावतात. त्यामुळे फुटव्यांची संख्या वाढून ऊस उत्पादनात भरघोस वाढ होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अधिकारी संदीप मोरडे यांनी कारखान्याच्या विविध शेतकरी हिताच्या योजना व उपक्रमांची माहिती दिली. शुगर केन डेव्हलपमेंट ग्रुपचे सुभाष मोरे यांनी हिरवळीच्या खताचे महत्त्व, पूर्वमशागतीचे नियोजन आणि ऊस लागवडीपूर्वी जमिनीची शास्त्रोक्त तयारी याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कारखान्याचे रुपेश डेरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अशोक डुकरे यांनी मानले. या मेळाव्यास औरंगपूर परिसरातील तसेच आजूबाजूच्या गावांतील मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## सोलापुरात १५ ऑगस्टपर्यंत धावणार ‘पीएम ई-बस’

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला आधुनिक आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी केंद्र शासनाच्या 'पीएम ई-बस सेवा' योजनेच्या अंमलबजावणीला आता कमालीची गती आली आहे. या योजनेअंतर्गत सोलापूर शहरासाठी १०० इलेक्ट्रिक बसेस मंजूर झाल्या असून, १५ ऑगस्टपर्यंत किमान १५ ते ३० बसेस रस्त्यावर आणण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या संदर्भात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात महापौर श्री. विनायक दादा कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाची आढावा बैठक पार पडली.



या बैठकीत बसेसची उपलब्धता, डॉ . बाबासाहेब आंबेडकर वाहनतळाचे काम, चार्जिंग सुविधा आणि बस पुरवठादार कंपनीसोबतच्या कराराबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. वाहनाचा ताफा आणि वाहनतळाचे काम अंतिम टप्प्यात

सोलापूर मनपासाठी एकूण १०० ई-बसेस मंजूर असून, यात ९ मीटर लांबीच्या ७० बसेस आणि १२ मीटर लांबीच्या ३० बसेसचा समावेश आहे. या बसेससाठी बुधवार पेठ (टी.पी. क्र. २) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाहनतळाचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. येथील नागरी बांधकामाचे ८० टक्के, तर ‘बिहाइंड द मीटर’ (BTM) वीज पायाभूत सुविधांचे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित काम जुलै २०२६ अखेरपर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती देण्यात आली.

ई-बस चालवणे आणि त्यांच्या देखभालीसाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या 'जेबीएम (JBM) प्रा. लि., नवी दिल्ली' या कंपनीसोबतच्या करारावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. या करारानुसार:

ई-बसचे संचालन, देखभाल-दुरुस्ती आणि चालकांची (Drivers) नियुक्ती कंपनीमार्फत केली जाईल.

वाहनतळावर ३३ केव्ही वीजवाहिनी, ५००० केव्हीए क्षमतेची वीज व्यवस्था आणि उपकेंद्राचे काम पूर्ण झाले असून, करारानंतर चार्जिंग पॉईंट्स तातडीने कार्यान्वित केले जातील.

लोकप्रतिनिधींच्या महत्वपूर्ण सूचना
बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधींनी
नागरिकांच्या सुविधेसाठी विविध
मागण्या आणि सूचना मांडल्या:
शहर व ग्रामीण भागात जास्तीत
जास्त बस फेऱ्या सुरू करणे.
बसथांब्यांवर वेळेचे फलक
(वेळापत्रक) लावणे
आणि ऑनलाइन तिकीट
सुविधा सुरू करणे.
विद्यार्थी, महिला आणि
तीर्थक्षेत्रांसाठी विशेष
बससेवा सुरू करणे.

"सोलापूरकरांना आधुनिक, सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त वाहतूक सेवा देण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी समन्वय राखून काम करावे. आगामी १५ ऑगस्टपर्यंत १५ ते ३० बसेस शहरात कशा सुरू होतील.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

- शिक्षण महर्षी राघू जाधव यांना जीवनगौरव पुरस्कार!
- शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव

अकोले : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारे यावर्षीचे राज्यस्तरीय शैक्षणिक पुरस्कार जाहीर करण्यात आले असून, शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल शिक्षण महर्षी राघू सावळेराम जाधव यांना प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. याशिवाय उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रणद खुर्द येथील विजय धुंदा कातडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार, तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे आदर्श शिक्षक पुरस्कार बबनराव गणपत सहाने यांना जाहीर झाला आहे. शासकीय आदर्श आश्रम शाळा, भंडारदरा कॅम्प (मवेशी) येथील मुख्याध्यापक जगन्नाथ एकनाथ जाधव यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. तसेच जय भवानी माध्यमिक विद्यालय, केळुंगण येथील मुख्याध्यापक संजय बाबुराव उकिरडे यांना माध्यमिक विभागातील राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तसेच आदिवासी उन्नती सेवा मंडळ संचलित अनुदानित प्राथमिक आश्रम शाळा, एकदरे येथील मुख्याध्यापक प्रल्हाद भिवसेन नेहे यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर झाला आहे. या सर्व पुरस्कारांचे वितरण महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असून, शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा यावेळी गौरव करण्यात येणार आहे.

# अकोले येथे २ जुलैला गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा

> गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असून, अकोले तालुक्यातील शिक्षण क्षेत्रासाठी हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

- राज्यभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा होणार गौरव!
- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्याचे आयोजन!




अकोले : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा गुरुवार, दि. २ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता इंदोरी फाटा येथील मातोश्री मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. दहावी, बारावी तसेच एमपीएससी, यूपीएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा या सोहळ्यात गौरव करण्यात येणार असून, शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून थोर समाजसेवक, नामवंत उद्योजक तथा एन. के. टी. ट्रस्टचे अध्यक्ष शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला उपस्थित राहणार आहेत. तर श्रीरामपूरचे पोलीस उपअधीक्षक सोमनाथ वाकचौरे हे विद्यार्थ्यांना यशाचा मंत्र देत प्रेरणादायी मार्गदर्शन करणार आहेत.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी माहिती देताना सांगितले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने दरवर्षी दहावी, बारावी तसेच एमपीएससी, यूपीएससी आणि विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केला जातो. यावर्षीही तालुक्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि आश्रमशाळांमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे, आदिवासी विकास महामंडळाचे संचालक तथा माजी आमदार वैभवराव पिचड, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अमित भांगरे, अकोले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी, उद्योजक माणिकराव डावरे, उत्तर नगर जिल्हाध्यक्ष सोमनाथ काळे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे पाटील, मुख्याध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष सुनील धुमाळ, सत्यनिकेतन संस्थेचे संचालक तथा माजी प्राचार्य प्रकाश टाकळकर, अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर नवले, कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. बी. एम. महाले, अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, आदिवासी उन्नती सेवा मंडळाचे सचिव एम. एम. भवारी, अगस्ती एज्युकेशन संस्थेचे सचिव सतीश नाईकवाडी, अगस्ती रुरल एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष ॲड. वसंतराव मनकर, आंतरभारती रुरल एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे सचिव सुधाकर देशमुख, आंतरभारती रुरल एज्युकेशन इंटरनॅशनल संस्थेचे सचिव डॉ. अनिल रहाणे, ज्येष्ठ पत्रकार रामलाल हासे, विद्याचंद्र सातपुते, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संगमनेर तालुका अध्यक्ष संजय गोपाळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमात शिक्षण, समाजकारण आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवरांचा सहभाग राहणार असून, विद्यार्थ्यांना करिअर, स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन मिळणार आहे. या कार्यक्रमास तालुक्यातील सर्व माध्यमिक, उच्च माध्यमिक व आश्रमशाळांतील गुणवंत विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका अध्यक्ष अशोक उगले, इलेक्ट्रॉनिक मीडिया अध्यक्ष सचिन खरात, संगमनेर इलेक्ट्रॉनिक मीडिया अध्यक्ष सहदेव चौधरी, कार्याध्यक्ष दत्ता जाधव, सचिव हरिभाऊ फापाळे, अकोले शहराध्यक्ष सुनील शेणकर, हल्ला विरोधी समितीचे अध्यक्ष शंकर संगारे, सहसचिव सचिन लगड, हरिभाऊ आवारी, तालुका उपाध्यक्ष सतीश फापाळे, जगन्नाथ आहेर, ललित मुतडक, गणेश रेवगडे, तालुका संपर्कप्रमुख संजय गायकर, सुनील आरोटे, संजय फुलसुंदर, अक्षय आभाळे, अशोक शेळके, राजेंद्र राठोड, सुरेश देशमुख, दत्ता हासे आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# सोलापुरात नवी राजकीय समीकरणे

- पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार दिलीप सोपल यांची आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत हातमिळवणी



सोलापूर : (स. गांवकरी)

बार्शी नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांना उद्देशून निधीवरून टीका करण्याऱ्या पालकमंत्री जयकुमार यांच्या हाती आमदार दिलीप सोपल यांचा हात पाहायला मिळाला. विशेष, म्हणजे विधानपरिषद निवडणुकीत देखील पालकमंत्री यांनी सोपल यांच्या ज्येष्ठत्वाचा दाखला देत, त्यांना फोन केल्याचं म्हटलं होतं. आता, विधिमंडळ अधिवेशनात दोघांची हातमिळवणी पाहायला मिळाली. यावेळी सोलापूर जिल्ह्याचे राजकीय केंद्र असलेल्या अक्कलकोट चे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोलापूर विधानपरिषद निवडणुकीत आमदार राजेंद्र राऊत यांचा एकतर्फी विजय झाला. त्यामुळे, बार्शी तालुक्याला दोन आमदार मिळाले आहेत. मात्र, या निवडणुकीच्या अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार दिलीप सोपल यांच्यातील राजकीय कडवटपणा कमी झाल्याचं दिसून आलं. कारण, गोरे यांनी सोपल यांचं कौतुक करत, त्यांच्याशी फोनवरून संवाद साधल्याचं सांगितलं होतं. तर, दिलीप सोपल हेही मविआ उमेदवार वसंत देशमुख यांच्या प्रचारार्थ कुठेही दिसले नाहीत. त्यानंतर, आता विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पालकमंत्री गोरे आणि आमदार सोपल यांच्यातील संवादाचा फोटो समोर आलाय. विशेष म्हणजे जयकुमार गोरे यांनीच हा व्हिडिओ शेअर केला आहे. त्यामुळे, आता निधीची कुठलीही अडचण भासणार नसल्याचं हे चित्र म्हणता येईल. दुसरीकडे आमदार राजेंद्र राऊत यांनी आमदारकीची शपथ घेताच श्री भगवंत तीर्थक्षेत्र आराखड्यासाठी 100 टक्के निधीची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. तसेच, पत्रकार परिषदेतून विकासनिधीबाबतही माहिती दिली. त्यामुळे, आता बार्शीच्या विकासाला डबल इंजिन लागल्याने विकासाचा हायस्पीड पाहायला मिळू शकतो.



नेवासा : नेवासा येथील सामाजिक क्षेत्रात योगदान देणारे व्यक्तिमत्त्व व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे प्रणित शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार यांनी रक्तदानाचे अर्ध शतक पूर्ण केल्याबद्दल त्यांचा गौरव एस बी आय बँकेचे शाखा प्रबंधक रणजित नाळे यांच्या हस्ते करण्यात आला. शिवसेनेच्या शिकवणी प्रमाणे वीस टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण करीत असलेल्या बालेंद्र पोतदार यांनी आतापर्यंत समाजात उपेक्षित घटकांसाठी काम केले आहे,रक्तदान करणे हे पवित्र कार्य असल्याने मी स्व:त याठिकाणी तीन महिन्यांनी रक्तदान तर करतोच उलट इतरांना ही प्रवृत्त करतो,हे करत असतांना रक्तदानाचे अर्ध शतक झाले हे मला माझ्या नोंदीनुसार कळले.


## थोडक्यात बातम्या...



### जेष्ठ पत्रकार सुभाष डोके यांच्या वाढदिनानिमित्त काव्य संमेलन

आळेफाटा (स. गांवकरी) : आळेफाटा येथील उद्योजक व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख सुभाषशेठ शांताराम डोके यांच्या वाढदिवसानिमित्त आळेफाटा येथे राज्यस्तरीय भव्य काव्य संमेलन स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेचे आयोजन पियुष शाम काळे यांनी केले होते. यामध्ये राज्यभरातून कवींनी सहभाग नोंदविला. परीक्षक म्हणून संदीप वाघुले सर(उत्कृष्ट निवेदक, कवी )यांनी काम पाहिले. स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ. मानसी मारुती राऊत (ऐरोली), द्वितीय क्रमांक नवनाथ मनोहर सरोदे (बोटा, अहिल्यानगर), तर तृतीय क्रमांक भालचंद्र खरळकर (पुणे) यांनी पटकावला. विजेत्या कवींचा सन्मान आळेफाटा येथील श्रीकृष्ण मोटर्स कार्यालयात आळेफाटा बॉडी बिल्डर व्यापारी असोसिएशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आला. उपस्थित सर्व मान्यवरांचा शाल, ट्रॉफी, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते जयसिंग भुजबळ, प्रकाशशेठ डोके खजिनदार आळेफाटा बॉडी बिल्डर असोसिएशन,आळेफाटा बॉडी बिल्डर युनियनचे नवनियुक्त अध्यक्ष सुदाम शर्मा, कार्याध्यक्ष संतोष गाडेकर, संचालक संतोष शर्मा, उद्योजक विजय माळी, दै. गावकरीचे पत्रकार सुदर्शन मंडले, तसेच अनेक पदाधिकारी,मान्यवर उपस्थित होते.

### नेटफ्लिक्सचा लॉक अप : वरुण लैला यादववर धक्कादायक आरोप केला



मुंबई (स. गांवकरी) : इनमेट इंट्रो आणि पेअरिंगच्या दरम्यान सुफी मोटीवाला आणि वरुण यादव यांच्यात वाद झाला. त्यावेळी सुफीने एका अस्वस्थ करणाऱ्या घटनेबद्दल सांगितलं, जी त्याचं आणि वरुणचं पार्टीत घडली होती. सुफीने दावा केला की त्या पार्टीत वरुण यादवने त्याला त्रास दिला होता. ही धक्कादायक गोष्ट ऐकून सगळेच गोंधळले आणि थक्क झाले. त्या रात्री नक्की काय घडलं होतं? हे उघड करण्यामागचं कारण काय होतं? आणि जेव्हा सुफीने आपली बाजू मांडली तेव्हा खोलीतली प्रतिक्रिया कशी होती? लैला म्हणजेच वरुण यादवने यावर कसं उत्तर दिलं? हे सगळं सत्य तुम्हाला एपिसोडमध्येच उलगडताना पाहायला मिळेल. लॉक अप: सच या सज़ा मध्ये प्रत्येक कैद्याजवळ एक सत्य असतं, पण प्रत्येक सत्याला दोन बाजू असतात. लॉक अप: सच या सज़ा आता नेटफ्लिक्सवर स्ट्रीमिंग सुरू आहे. नवीन एपिसोड्स दर शनिवार ते बुधवार रात्री 8 वाजता पाहायला मिळतील.



### नांदूर पठार येथे सेंट्रल बँकेच्या मिनी शाखेचे भव्य उद्घाटन

पारनेर (स. गांवकरी) : ग्रामीण भागातील बँकिंग सुविधेच्या विस्तारासाठी महत्त्वाचा टप्पा म्हणून पारनेर तालुक्यातील नांदूर पठार येथे सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मिनी शाखेचे (उपशाखेचे) उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. परभणी जिल्हा परिषद सदस्य आणि नांदूर पठार गावचे सुपुत्र भरत दादा घनदाट यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते दीपक अण्णा लंके यांच्या शुभहस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते रवींद्र राजदेव, सरपंच संदीप चौधरी, उपसरपंच सुनील राजदेव, माजी सरपंच भानुदास आग्रे, हरीभाऊ आहेर, नवनाथ पाटील घोलप, दत्तात्रय देशमाने, मारुती आग्रे, पंढरी आग्रे, ज्ञानदेव लक्ष्मण चौधरी, विलास महाराज आहेर, राजेंद्र राजदेव, रामदास राजदेव, बबन घोलप, स्वप्नील राजदेव, बाबाजी चौधरी, ग्रामसेवक रामदास सांगळे, प्रकाश राजदेव, संतोष घनदाट, रामलाल राजदेव, नवनाथ आहेर, रवींद्र चौधरी, शुभम आहेर, शिवाजी महाराज आग्रे, दादा पाटील राजदेव, मोहन राजदेव, रामदास चौधरी, ज्ञानदेव श्रीपती चौधरी, भगवंत हाढवळे, राजाराम राजदेव, मंगेश आहिले, अमोल गाडगे, सागर शिरतार यांच्यासह विकास विद्यालय व प्राथमिक शाळेचे सर्व विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ आणि माताभागिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन समारंभानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वह्या आणि खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना भरत दादा घनदाट यांनी गावात झालेल्या विविध विकासकामांचे कौतुक केले आणि ग्रामीण भागात बँकिंग सुविधा उपलब्ध झाल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले. त्यांनी भविष्यात गावच्या प्रगतीसाठी सर्व स्तरातून सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त अभिवादन गुणवंतांचा विशेष सत्कार



**शिवजन्मोसो मध्यवर्ती महामंडळाचा उपक्रम**

सोलापूर : (स. गांवकरी)

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज मध्यवर्ती मंडळाच्या वतीने अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात सामाजिक, शैक्षणिक व लोकहिताच्या कार्यात योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. बार असोशियन निवडणुकीत यश मिळविल्याबद्दल ॲड. मिलिंद थोबडे, पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याबद्दल वैभव गंगणे यांचा विशेष सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक समतेच्या, शिक्षणप्रसाराच्या आणि बहुजन कल्याणाच्या कार्याचा गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि समाजहितासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प व्यक्त केला. या कार्यक्रमास ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, राजन जाधव,उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, हेमंत चौधरी, सदाशिव पवार, प्रकाश ननवरे, लिंबाजी जाधव, किरण भंडारी, दादा सुरवसे, संदीप साळुंखे, उज्वलाताई लाळुंखे, लक्ष्मण माळी, सुशील बंदपट्टे , विजय भोसले, दिनेश जाधव, महादेव गवळी, सूर्यकांत पाटील, जगदीश पाटील, ब्रह्मदेव माने मतिन बागवान, श्रीकांत डांगे, दिलीप कोल्हे, शिवाजी वाघमोडे, माऊली पवार, जी. के. देशमुख, संजय जाधव, राम कदम, लहू गायकवाड, महादेव गवळी लता ढेरे, जीवन यादव देविदास घुले, सचिन स्वामी यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धोत्री येथे 'पहाट' उपक्रमांतर्गत पारधी समाजाशी संवाद

सोलापूर : (स. गांवकरी)

दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथे 'पहाट' उपक्रमांतर्गत पारधी समाजाशी संवाद साधण्यात आला; या संवाद कार्यक्रमात शिक्षण, रोजगार व पाणीप्रश्नी यावर चर्चा करण्यात आली. सोलापूर चे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या कल्पनेतून हा कार्यक्रम धोत्री या गावात राबविण्यात आला. दिनांक २७ जून २०२६ रोजी मौजे धोत्री येथे माननीय पोलीस अधीक्षक श्री. अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या 'पहाट' उपक्रमाअंतर्गत पारधी समाजातील सुमारे ७० ते ८० नागरिकांशी संवाद व बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत पोलीस अधीक्षक श्री. अतुल कुलकर्णी यांनी पारधी समाजाच्या विविध अडचणी जाणून घेतल्या. समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाला प्राधान्य द्यावे व प्रत्येक मुलाने शिक्षण घेऊन उज्वल भविष्य घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच पारधी समाजातील महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी शिलाई मशीन, कांडप मशीन तसेच इतर आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी गावातील शेतकरी, सरपंच तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. धोत्री येथील पारधी वस्तीवरील पिण्याच्या पाण्याच्या समस्येबाबतही उपस्थितांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीची प्रस्तावना वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. राहुल डोंगरे यांनी केली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक श्री. रविराज कांबळे तसेच वळसंग पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## आठवणींना उजाळा; भांडी, खाऊ आणि साडी वाटप



मुरबाड : (स. गांवकरी)

मुरबाड तालुक्यातील शेलारी गावाच्या हद्दीत असलेल्या गुलाबीवाडी या आदिवासी वस्तीमध्ये कैलासवासी हरिभक्ती पारायण अभिमन्यू गोविंद तांडेल,शांताबाई गोविंद तांडेल आणि प्रतिभाताई पाटील यांच्या स्मरणार्थ सामाजिक महिला कार्यकर्त्या शोभा तांडेल तसेच उद्योजक प्रकाश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गुलाबीवाडी या आदिवासी वस्तीतील महिलांना साडी- पातळ वाटप, तसेच कुटुंबांना भांडी वाटप आणि खाऊ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी उद्योजक प्रकाश पाटील, प्रभावती पाटील, शोभा तांडेल, लक्ष्मी तांडेल, सामाजिक महिला कार्यकर्त्या भारती भोईर, अरुण भोईर ,भालचंद्र भोईर,यशवंत वाघ , उंद्रू वाघ, गुलाबताई पवार,अंकुश वाघ तसेच या आदिवासी वस्तीत राहणारे ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन भरत दळवी यांनी केले. यावेळी शोभा तांडेल यांनी आपल्या पती अभिमन्यू तांडेल आणि सासू शांताबाई तांडेल यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि प्रकाश पाटील - प्रभावती पाटील यांनी आपली मुलगी प्रतिभाताई पाटील यांच्या स्मरणार्थ एक सामाजिक बांधिलकी म्हणून हा कार्यक्रम राबविला. दरवर्षी उद्योजक प्रकाश पाटील हे या भागातील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना वही दप्तर वाटप करत असतात. ही मदत केल्याबद्दल यावेळी आदिवासी वस्तीत राहणाऱ्या गावकऱ्यांनी तांडेल आणि पाटील परिवाराचे आभार मानले.

## डॉ. पाऊलबुद्धे फार्मसीचे 'नशामुक्त भारत अभियान' जनजागृती रॅलीत जिल्हाधिकारी यांची उपस्थिती

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर मधील वसंत टेकडी येथील डॉ.एन.जे. पाऊलबुद्धे फार्मसी महाविद्यालयातर्फे 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत समाजामध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने मंगळवार दि.३० जून २०२६ रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीमध्ये जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया उपस्थित राहणार आहेत.

ही रॅली श्रीराम चौक ते डी-मार्ट या मार्गावर आयोजित करण्यात येणार असून, राष्ट्रीय सेवा योजना (NSS), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच समाजकल्याण विभाग, अहिल्यानगर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहे.या रॅलीचे उद्देश स्पष्ट करताना प्राचार्य डॉ. श्याम पंगा यांनी सांगितले की, सध्याच्या काळात युवकांमध्ये वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या सेवनामुळे निर्माण होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. या पार्श्वभूमीवर युवकांमध्ये



व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. "नशा सोडा – जीवन जोडा" हा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे असे ते म्हणाले.

या जनजागृती रॅलीसाठी भंडारी क्लॉथ स्टोअर्स, अनंत कलेक्शन, बुधवंत स्किन केअर क्लिनिक, भारत केमिकल्स, सौरभ ट्रॅव्हल्स आणि ऑस्टिऑन हॉस्पिटल यांचे मोलाचे सहकार्य व प्रायोजकत्व लाभले आहे.

या उपक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्याचे मा.जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले असून, त्यांनी या सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले असून या रॅलीसाठी आपण आवर्जून उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. या उपक्रमात पोलीस अधीक्षक श्री.मुम्मका सुदर्शन, समाजकल्याण अधिकारी श्री. देविदास कोकाटे तसेच राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जिल्हा समन्वयक श्री. गणेश निमसे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सर्व मान्यवरांना फार्मसी कॉलेजच्या वतीने निमंत्रण देण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.श्याम पंगा प्राचार्य अनुराधा चव्हाण, डॉ. वेणु कोला, डॉ. विजय तारडे डॉ. रोशनी सूर्यवंशी, स्वाती कडूनोर उपस्थित होते.

या उपक्रमात सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सर्व शैक्षणिक शाखांतील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी या जनजागृती रॅलीमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविणार असून, व्यसनमुक्त भारताचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी एकजुटीने सहभागी होणार आहेत.

महाविद्यालयातर्फे सर्व विद्यार्थी, युवक, नागरिक, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक संघटनांनी या जनजागृती रॅलीमध्ये सहभागी होऊन व्यसनमुक्त, सुदृढ आणि निरोगी समाजाच्या निर्मितीस हातभार लावावा, असे आवाहन फार्मसीच्या महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

## ग्रामीण आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणे हेच संस्थेचे ध्येय

### डॉ. भाऊसाहेब खिलारी : ढोकेश्वर विद्यालयातील MHT-CET परीक्षेतील गुणवंतांचा भव्य सत्कार

टाकळी ढोकेश्वर : (स. गांवकरी)

शिक्षण क्षेत्रात कोचिंगच्या नावाखाली सध्या फार मोठया प्रमाणात लूट चालू आहे. पेपर फुटी ही शिक्षण क्षेत्राला लागलेली कीड आहे. त्याचा फटका ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना बसतो. म्हणून विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्त बाळगून डॉ. सी. व्ही. रमण CET केंद्राच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास केल्यास तुमच्या स्वप्नांना पंख देण्याचे काम जिल्हा मराठा संस्था करेल असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले. ढोकेश्वर जुनिअर कॉलेज



मध्ये MHT-CET परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरुन डॉ. खिलारी बोलत होते.

विद्यालयात हे MHT- CET केंद्र डॉ. खिलारी यांच्या मार्गदर्शनाने एक वर्षांपूर्वी चालू केले होते. सन 2025 -26 वर्षातील MHT-CET परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये PCM व PCB दोन्ही ग्रुप मध्ये विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले.

यात PCM ग्रुप मध्ये शिंदे सुयोग -96.41, वाळुंज भक्ती-95.66, शेळके सानिका -92.85, सोनावळे सोहम -92.61, रोकडे श्रद्धा -91.38, झावरे आदेश -90.80, विरकर समृद्धी -89.68, आंधळे श्रुती -86.71, शेळके स्वराज -85.92, बांडे नम्रता -85.29, झावरे प्रेरणा अमोल -85.15, भांड वैष्णवी संतोष -81.93 या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले तर PCB ग्रुप मध्ये विरकर समृद्धी -96.51, चौधरी भव्यता -96.19, पवार समीक्षा -91.97, रोकडे तन्मय-90.06, राऊत आदित्य -89.20, झावरे समीक्षा-84.66, शिंदे निकिता -80.75. या विद्यार्थांनी घवघवीत यश मिळवले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य डॉ. श्री. भाऊसाहेब खिलारी, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, पत्रकार चांद शेख, भोंद्रे गावचे सरपंच अभिजित झावरे व ग्रामस्थ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना अशोक गांगड, अतिश झावरे, योगेश मांडगे, सचिन महानवर, भाऊसाहेब हिंगडे, सुनिल झावरे, मंगेश पोपळघट, नितीन ढोकळे, सोनल शिंदे, मिना खाडे या प्राध्यापकांनी वर्षभर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी संतोष सोनावळे, डॉ.अरुण झावरे, शंकर शेळके, छबुराव चौधरी, सूर्यभान भालेकर, संदीप बांडे, मेजर अशोक रोकडे, गणेश शिंदे, संतोष भांड, शांताराम आंधळे, भरत भांड, वनिता भांड, रावसाहेब रोकडे, संदीप रोकडे, बाळासाहेब झावरे, संजय शिंदे, यशवंत वीरकर, महिला पालकांमध्ये प्रा. रंजना दाते, सविता शेळके, सौ शिंदे, सौ. भांड, विजय दळवी, अनिकेत बांगर, सुवर्णा दिघे आदी पालक आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भाऊसाहेब हिंगडे यांनी केले. प्रास्ताविक अशोक गांगड यांनी केले तर आभार सचिन महानवर यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)